सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महत्वाचे / कालमर्यादीत

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/ 1851

प्रति,

दिनांक :- 01 JUL 2025

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक २/एनजीसी/Intake Approval/२०२५/५४६ दिनांक ३०/०६/२०२५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबतचे संदर्भीय पत्र सोबत जोडले आहे. कृपया त्याचे अवलोकन करुन त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व कौसिल ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली यांच्याकडून मान्यताप्राप्त संस्थांमधील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधीत शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधीत विद्यापिठाची सलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन **दिनांक १०/०७/२०२५ ला सायंकाळी ५ वाजेपर्यंत** ऑनलाईन पध्दतीने सादर करुन आवश्यक कागदपत्रासह या कार्यालयात उपस्थित राहावे. कोणत्याही संस्थेची माहिती अद्ययावत करणे प्रलंबित राहिल्यास व त्यामुळे संस्थेचा समावेश केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीमध्ये न झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहिल. तसेच मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्‌भवल्यास त्यास संबंधीत संस्थेचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे.

(मनोज म. अंधारे)
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना कळविण्यात येते की, सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने विशेष दक्षता घेवून online approved करावे तसेच संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५, ४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

महत्वाचे परिपत्रक/कालमर्यादित

क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/५८६ दिनांक : 30 JUN 2025

प्रति,
प्राचार्य / संचालक
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : १)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/Intake Approval/२०२५/४१८, दि.२३.५.२०२५
२)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/Intake Approval/२०२५/५०१, दि.१७.६.२०२५

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असल्याने संस्थेबाबत पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडून संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती, तसेच त्यासोबत संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या https://ugpg25.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत करून दि. १५ जुन २०२५ व तद्नंतर दि.०१ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. मात्र अद्यापही काही संस्थांनी त्यांची माहिती अद्ययावत केलेली नाही. तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रवेश प्रक्रियेकरीता विद्यार्थ्यांना नोंदणी करण्याकरीता मुदतवाढ दिलेली आहे. प्रवेश प्रक्रियेकरीता दिलेल्या मुदतवाढीस अनुसरून सर्व संस्थांनी दिनांक १०.०७.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे.

ज्या संस्था अशी माहिती अद्ययावत करणार नाहीत, अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीसाठी सादर
२. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर-
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि.११.०७.२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.
४. अध्यक्ष / सचिव, सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
५. कार्यासन अधिकारी, का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई
यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.